**वारसा अर्ज क्र. ९०/२०२१ मधील नि.०१ खालील आदेश**
**सावित्री सदाशिव कोरडे वगैरे वि. मंगल सदाशिव कोरडे वगैरे**
**CNR NO. MHST050006422021**

सदरचा अर्ज अर्जदार यांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार क्र.१ ही मयत सदाशिव कोरडे यांची पत्नी असून अर्जदार क्र.२ ही मुलगी आहे. अर्जातील कथन असे आहे की, सामनेवाली क्र.१ याचे सोबत मयत सदाशिव कोरडे याचे विवाहबाहय संबंध होते. त्यामुळेच त्यांनी अर्जदार यांना घरातुन हाकलून दिले. सदाशिव कोरडे यांचा दि.०२.०६.२०२१ रोजी मृत्यू झाला. त्यांनी कोणतेही मृत्युपत्र करुन ठेवले नव्हते. त्यामुळे अर्जदार यांना संबंधित कार्यालयाकडून वारसा दाखल्याची मागणी करण्यात आली. या कारणास्तव सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. अर्ज दाखल करतेवेळी सामनेवाली क्र.३ ही पुणे येथे रहात असल्याची माहिती असल्यामुळे अर्जात पुण्याचा पत्ता नमूद केलेला आहे. परंतु सदर पत्त्यावर नोटीसची बजावणी झालेली नाही. त्यानंतर अर्जदार यांना असे समजून आले की, सामनेवाली क्र.३ ही तिचे पतीच्या मृत्युनंतर कराड शहरातच राहण्यास आलेली आहे. त्यानुसार कराड मधील पत्त्यावर नोटीस पाठवण्यात आली. परंतु तीही न बजावता परत आलेली आहे. सामनेवाली क्र.३ ही सध्या कराड येथेच रहाण्यास असल्याची खात्री व माहिती असल्यामुळे त्यांनी दैनिक वर्तमानपत्रात नोटीस प्रसिध्द केलेली आहे. सदर म्हणण्याचे पृष्टयर्थ अर्जदार यांनी आजरोजी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

०४. सामनेवाली क्र.१ तर्फे वकील यांनी सामनेवाली क्र.३ हिला कायद्यातील

तरतुदीनुसार नोटीसची बजावणी झाली नसल्यामुळे एकतर्फा आदेश पारीत करण्यात येवू नये असे तोंडी सांगितले. सामनेवाली क्र.१ ही सामनेवाली क्र.३ ची आई आहे. सामनेवाली क्र.१ ही अर्जाचे कामी हजर आहे. यावरुनच सामनेवाली क्र.३ हीला या अर्जाची माहिती आहे असे स्पष्ट होते. आजरोजी अर्जदारतर्फे प्रतिज्ञापत्र (नि.४२) दाखल करुन सामनेवाली क्र.३ ही कराड मधेच राहते असे शपथेवर सांगण्यात आले. त्यामुळे दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली नोटीस ग्राहय धरुन सामनेवाली क्र.३ हिला दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम २० प्रमाणे नोटीसची बजावणी झाली असे समजण्यात येते. त्यामुळे आजरोजी सामनेवाली क्र.३ गैरहजर असल्यामुळे तिचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात येतो.

०५. सामनेवाली क्र.२ हिला नोटीसची बजावणी होवूनही केसच्या कामी गैरहजर असल्यामुळे तिचेविरुध्द 'एकतर्फा' आदेश पारीत करण्यात येतो. सामनेवाली क्र.४ हीने वेळेत म्हणणे न दिल्यामुळे तिचेविरुध्द 'म्हणणे नाही' असा आदेश पारीत करण्यात येतो.

JYOTI JAGNNATH MANE
Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.07.15 16:14:42 +0530

ठिकाणः कराड ( जे.जे.माने )

दिनांकः १५.०७.२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.